## MAHARASHTRA ACT No. X OF 1966

## THE POONA MUTHA RIVER FLOOD LIMITS (PROHIBITION OF BUILDING) AND PROVISION FOR ALTERNATIVE BUILDING SITES (REPEAL) AND INDEMNITY ACT, 1965.

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २९ एप्रिल १९६६ रोजी मिळाली असून तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. X OF 1966

## AN ACT TO REPEAL THE POONA MUTHA RIVER FLOOD LIMITS (PROHIBITION OF BUILDING) AND PROVISION FOR ALTERNATIVE BUILDING SITES ACT, 1961 AND INDEMNIFY AUTHORITIES AND PERSONS WHO HAVE ACTED IN PURSUANCE OF THE SAID ACT.

## सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १० मे १९६६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

**पुणे मुठा नदी पूर-मर्यादा (इमारती बांधण्यास प्रतिबंध) आणि इमारतींच्या पर्यायी जागांची तरतूद अधिनियम, १९६१ रद्द करणे व उक्त अधिनियमास अनुसरून ज्या प्राधिकाऱ्यांनी व इसमांनी काम केले आहे त्यांना निस्तारण देणे याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, पुणे मुठा नदी पूर-मर्यादा (इमारती बांधण्यास प्रतिबंध) आणि इमारतींच्या पर्यायी जागांची तरतूद अधिनियम, १९६१ हा रद्द करणे व उक्त अधिनियमास अनुसरून ज्या प्राधिकाऱ्यांनी व इसमांनी काम केले आहे त्या प्राधिकाऱ्यांना व इसमांना निस्तारण देणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास पुणे मुठा नदी पूर-मर्यादा (इमारती बांधण्यास प्रतिबंध) आणि इमारतींच्या पर्यायी जागांची तरतूद (रद्द करणे) व निस्तारण अधिनियम, १९६५ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. या अधिनियमात "महानगरपालिका" या संज्ञेचा अर्थ, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये रचना करण्यात आलेली पुणे शहर महानगरपालिका, असा समजावा. व्याख्या.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ रद्द करणे.

३. कलम ५ च्या उपबंधांस अधीन राहून, पुणे मुठा नदी पूर-मर्यादा (इमारती बांधण्यास प्रतिबंध) आणि इमारतींच्या पर्यायी जागांची तरतूद अधिनियम, १९६१ हा याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

निस्तारण.

४. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीमध्ये काहीही असले तरी, प्राधिकारी मंडळ आणि कोणत्याही वेळी त्या मंडळाचा सदस्य म्हणून पदावर असलेला त्या मंडळाचा प्रत्येक सदस्य आणि सचिव, व रद्द करण्यात आलेल्या अधिनियमान्वये त्या प्राधिकारी मंडळावर नियुक्त करण्यात आलेला व नेमून दिलेला कर्मचारी वर्गाचा प्रत्येक सदस्य किंवा इतर इसम, आणि राज्य सरकार व त्या सरकारचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी आणि महानगरपालिका व महानगरपालिकेचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी, आणि वर नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांपैकी किंवा इसमांपैकी कोणत्याही प्राधिकाऱ्यांच्या किंवा इसमाच्या आदेशान्वये, निदेशान्वये किंवा अनुदेशान्वये किंवा त्यास अनुसरून काम करणारा प्रत्येक इसम यांना, आता रद्द करण्यात आलेल्या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा तदनुसार सद्भावनापूर्वक केलेले किंवा करण्याचे अभिप्रेत असलेले कोणतेही कृत्य, बाब किंवा गोष्ट याबद्दल, त्या संबंधात किंवा त्या बाबतीत किंवा त्या उपबंधान्वये किंवा तदनुसार जे करणे आवश्यक होते ते सद्भावनापूर्वक न केल्याबद्दल किंवा ते करावयाचे राहून गेल्याबद्दल व त्या संबंधात किंवा त्या बाबतीतील सर्व परिणामापासून—मग ते दिवाणी असोत वा फौजदारी असोत—याद्वारे संयुक्तपणे व पृथक्पणे मुक्त करण्यात येत आहे, निस्तारण देण्यात येत आहे व मोकळे करण्यात येत आहे. आणि तदनुसार, वर नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांपैकी किंवा इसमांपैकी कोणत्याही प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा इसमांविरुद्ध कोणत्याही न्यायालयात दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाची कोणतीही कारवाई किंवा वैध कार्यवाही दाखल करता कामा नये किंवा चालू ठवता कामा नये.

बचाव.

५. ह्या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, मुंबई येथील उच्च न्यायालयाने आपल्या स्वाभाविक व सामान्य क्षेत्राधिकारात आणि भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २२६ अन्वये आपल्या क्षेत्राधिकारात सन १९६२ चे विशेष दिवाणी अर्ज क्रमांक १२१, ६२७, ६९८, ६९९, ७०६, १०२६, ११४१, ११४५, ११५०, ११६८, ११७१, १३४६ व १४५७ (रामदास नथुभाओी शाह व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर) यात दिलेल्या कोणत्याही न्यायनिर्णयास, हुकूमनाम्यास किंवा आदेशास किंवा अपिलात देण्यात येईल अशा कोणत्याही न्यायनिर्णयास, हुकूमनाम्यास किंवा आदेशास बाध येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.